महाराष्ट्र शासन
# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक २००३६, मुंबई ४००००१.
*www.dvet.gov.in e-mail: desk6@dvet.maharashtra.gov.in Phone No. २२६२०१११ / Fax No. २२६७५६२८*

**अतीमहत्वाचे** **क्रमांक-** ६/व्हिओसी/मान्यता/२२०३/२०१४/ ३२२
दिनांक- १९/०६/२०१४

प्रति,
सहसंचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद /
अमरावती / नागपूर.

**विषय- राज्यातील विना अनुदानित व कायम विना अनुदानित व्यवसाय अभ्यासक्रमातील तांत्रिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तीक मान्यता / सेवापुस्तक देणेबाबत**

संदर्भ- १) शासन निर्णय क्रमांक व्हीओसी-२००९/(१०९/०९)/व्यशि-४, दिनांक ११ मार्च, २०१०
२) महाराष्ट्र विधान परिषद नियम ९३ अन्वये उपस्थित केलेली सूचना क्र. ४३ जून २०१४

शासनाच्या संदर्भाधीन शासन आदेशान्वये राज्यातील अशासकीय विना अनुदानित / कायम विना अनुदानित संस्थांतील मंजूर व्यवसाय अभ्यासक्रमाच्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीस मान्यता या अशासकीय अनुदानित संस्थांतील कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती मान्यता पध्दतीप्रमाणे अवलंबवण्यास शासनाची मान्यता देण्यात आलेली आहे. अशासकीय अनुदानित व विना अनुदानित / कायम विना अनुदानित संस्थेतील कर्मचाऱ्यांना मान्यता देण्याची एकच पध्दती अवलंबविण्यात यावी.

करीता उच्च व तंत्र शिक्षण विभागाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शन सूचना शासन निर्णय क्रमांक व्हीओसी/२०१२/प्र.क्र.१७/व्यशि ४, दिनांक ०६/०२/२०१२ अन्वये निर्गमित केलेल्या आहेत. त्याप्रमाणे एकाच पध्दतीचा अवलंबकरुन वैयक्तिक मान्यता प्रादेशिक कार्यालयाने देणे आवश्यक आहे. मागिल ३ वर्षात फक्त पुणे

विभागात संस्थांकडून काही प्रस्ताव मान्यतेकरीता सादर करण्यात आले होते. तथापि ते परीपुर्ण नसल्यामुळे मान्यता देण्यात आली नाही.

शासनाने सदरहू शासन निर्णयात वर्षातून ३-४ शिबीरे आयोजितकरुन प्रस्ताव मंजूर करण्याची कार्यवाही करावी असे सुध्दा कळविले आहे. राज्यात या शिबीरांची सुसुत्रता असावी यासाठी खालीलप्रमाणे कालबध्द कार्यक्रम ठरवून देण्यात येत आहे. यासाठी प्रथम सर्व अशासकीय विना अनुदानित संस्थांना दिनांक ०६/०२/२०१२ च्या शासन निर्णयाप्रमाणे अटी व शर्ती ७ दिवसांच्या आत कळविण्यात याव्यात.

द्विलक्षी अभ्यासक्रमातील विना अनुदानित संस्थेतील शिक्षकांची संख्या अधिक असल्याने जुलै २१ ते जुलै २५ या दरम्यान ३ दिवसांची प्रादेशिक कार्यालय स्तरावर शिबीर घेण्यात यावे. तद्नंतर +२ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाचे ऑगस्ट २०१४ या महीन्यात त्याच तारखेदरम्यान शिबीर घेण्यात यावे व सप्टेंबर २०१४ या महीन्यात तंत्र माध्यमिक शाळेतील शिक्षकांसाठी त्याच तारखेदरम्यान शिबीर घेण्यात यावे. या तिन्ही योजनेतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या एकूण प्रकरणाचा आढावा सप्टेंबर २०१४ अखेर संचालनालय स्तरावर घेण्यात येईल. तद्नंतर पुढील कार्यक्रम निश्चित करण्यात येईल.

उपरोक्त वेळापत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व संस्थांना कळविण्यात यावे. भविष्यात विधीमंडळात पुनश्च: प्रश्न उपस्थित झाल्यास त्या संबंधीची आपल्या विभागातील माहिती अद्ययावत करुन ठेवावी. सोबत शासन निर्णयाची प्रत परिपत्रीत करण्यात येत आहे.

चालू सत्र २०१४-१५ नवीन संस्थांना शासनाकडून व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्याची परवानगी देण्यात येईल व त्यासाठी पायाभूत सुविधा व शिक्षक नेमणूक इत्यादी पुर्तता करुन निरीक्षणाअंती संचालनालयाकडून प्रवेशाची परवानगी देण्यात येते. आता असे प्रस्ताव सादर करतांना शिक्षक नेमणूकीचे प्रस्ताव सुध्दा आपल्या स्तरावरुन तपासून त्यांना मान्यता देण्यात यावी.

आपला विश्वासू,

(ज.द.भुतांगे)
संचालक, व्यवसाय शिक्षण

general